सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात खरीप हंगामासाठी कृषि निविष्ठा (कीटकनाशके) यांचे खरेदी करणेसाठी खुल्या बाजारातून दरपत्रके निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. सदरील प्रक्रिया राबविताना ४ पुरवठादारांकडून दरपत्रके प्राप्त झालेली होती. त्यापैकी २ दरपत्रके हे एकाच निविदाधारकाची असल्यामुळे एकच दरपत्रक ग्राह्य धरण्यात आले व उर्वरित २ निविदाधारकांच्या दरपत्रकापैकी १ दरपत्रक तांत्रिकदृष्ट्या पात्र झाले. सोयाबीन पिकाच्या हंगामाची परीस्थिती लक्षात घेता कीटकनाशकांचा पुरवठा करणे तातडीचे असल्यामुळे निविदा प्रक्रिया पुन्हा नव्याने राबविणे शक्य नव्हते. त्यामुळे ४ दरपत्रकाचे तांत्रिक मूल्यमापन करण्यात आले असून त्यामध्ये २ निविदाधारक अपात्र झाले. २ पात्र निविदाधारकांच्या दरपत्रकाचे आर्थिक मूल्यमापन करण्यात आले आणि रुपाली फर्टीलायझर यांचे दर सर्वात कमी असल्यामुळे त्यांना पुरवठा आदेश देण्यात आला.

यापुढे कृषि निविष्ठा खरेदी प्रक्रिया राबविताना योग्य ती दक्षता घेऊन निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल. करिता सदरील लेखा आक्षेप वगळण्यात यावा. हि विनंती.

Gajanan Gunde

नोडल अधिकारी

जिल्हा अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट

लातूर